# स्वामी रामानंद तीर्थ
# मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

## दूरशिक्षण संचालनालय

पदव्युत्तर पदवी (एम.ए.) द्वितीय वर्ष

*** लोकप्रशासन ***



खंड क्र. (०६)   कल्याणकारी प्रशासन

## मानवविज्ञान विद्याशाखा अभ्यासमंडळ

**डॉ. उध्दव भोसले,** कुलगुरू, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

- **प्राचार्य डॉ. जे.एम. बिसेन**
  अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा
- **डॉ. केशव देशमुख**
  अध्यक्ष, मराठी अभ्यासमंडळ
- **डॉ. आर. एम. जाधव**
  अध्यक्ष, हिन्दी अभ्यासमंडळ
- **डॉ. एम.एम. निवरगी**
  अध्यक्ष, इंग्रजी अभ्यासमंडळ
- **डॉ. हमीद अशरफ**
  अध्यक्ष उर्दू अभ्यासमंडळ
- **डॉ. गणंजय कहाळेकर**
  अध्यक्ष, संस्कृत अभ्यासमंडळ
- **डॉ. आत्माराम शिंदे**
  अध्यक्ष, इतिहास अभ्यासमंडळ
- **डॉ. नारायण कांबळे**
  अध्यक्ष, समाजशास्त्र अभ्यासमंडळ
- **डॉ. विलास आघाव**
  अध्यक्ष, राज्यशास्त्र अभ्यासमंडळ
- **डॉ. अरूण तवार**
  अध्यक्ष, अर्थशास्त्र अभ्यासमंडळ
- **डॉ. उत्तम इंगळे**
  अध्यक्ष, लोकप्रशासन अभ्यासमंडळ
- **डॉ. सुनिल सांळुके**
  अध्यक्ष, तत्वज्ञान अभ्यासमंडळ



| | |
|---|---|
| **अभ्यासक्रम समन्वयक** | **संचालक, दूरशिक्षण संचालनालय, स्वा.रा.ती.म.वि., नांदेड** |
| **शिक्षणक्रम समन्वयक** | **डॉ. गोविंद यमलवाड** |
| **भाषा संपादन** | **डॉ. सुरेश गजभारे** |
| **आशय संपादन** | **डॉ. विजय तरोडे** |
| **अनुदेशन संपादन** | **प्राचार्य डॉ. राम जाधव व डॉ. दिपक कोंडावार** |
| **पुस्तक निर्मिती** | **संचालक, दूरशिक्षण संचालनालय, स्वा.रा.ती.म.वि., नांदेड** |
| **प्रकाशक** | **कुलसचिव, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड** |
| **©कॉपी राईट** | **कुलसचिव, स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड** |


सदरील मुद्रित साहित्याचे सर्व अधिकार मा. कुलसचिव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्याकडे आरक्षित. या मुद्रित साहित्याचा कुठलाही घटक, आशय, भाग यांची पुनर्निर्मिती करता येणार नाही किंवा संगणकात साठवता येणार नाही. त्याचे कुठल्याही साधनात, साहित्यात मा. कुलसचिव यांच्या परवानगीशिवाय संक्रमण करता येणार नाही.

**अस्वीकृत :** या पुस्तकातील मुद्रित साहित्य केवळ शैक्षणिक उदिष्ट डोळयांसमोर ठेवून तयार केले आहे ते मार्गदर्शक तत्त्वे किंवा शिफारस नव्हे. सदरील पुस्तकातील खंड रूपातील आशय हा सध्या चालू अभ्यासक्रमातील प्रकाशित आशयावरील माहितीचे संकलन आहे; ज्यात अभ्यासमंडळाचे अध्यक्ष व अधिष्ठाता यांचे योगदान आहे. या खंडातील माहिती गरजेनुसार, नियमानुसार, मागणीनुसार व उपलब्ध कायद्याच्या आधारे बदलल्या जाऊ शकते.

मुखपृष्ट सजावट : डॉ. दिपक कोंडावार, **समन्वयक, दूरशिक्षण संचालनालय,** स्वा.रा.ती.म.वि.नांदेड.

मुद्रक :

# अनुक्रमणिका


| घटक क्र. | घटकाचे नाव | लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | कल्याणकारी प्रशासन : अर्थ,स्वरूप, व्याप्ती व महत्व | डॉ. सुरेश गजभारे | ०१ |
| २ | कल्याणकारी प्रशासनाचे संघटन | डॉ. सुरेश गजभारे | १० |
| ३ | कल्याणकारी प्रशासनाचे प्रमुख क्षेत्र | डॉ. विजय तरोडे | २३ |
| ४ | कल्याणकारी योजना | डॉ. संजय देबडे | ४१ |
| ५ | कल्याणकारी प्रशासनातील घटक | डॉ. संजय देबडे | ५३ |
| ६ | कल्याणकारी प्रशासनासमोरील समस्या | डॉ. विजय तरोडे | ६५ |

# घटक क्र. ६.५ कल्याणकारी प्रशासनातील घटक

अनुक्रम

**५.० प्रास्ताविक**

**५.१ उद्दिष्ठे**

**५.२ स्वयंसेवी संस्था**

५.२.१ अर्थ

५.२.२ व्याख्या

५.२.३ उद्देश

५.२.४ वैशिष्ट्ये

५.२.५ स्वयंसेवी संस्थांची भूमिका

**५.३ अशासकीय संस्था**

५.३.१ व्याख्या

५.३.२ वैशिष्ट्ये

५.३.३ अशासकीय संस्थेची कार्य

**५.४ प्रसारमाध्यमे**

५.४.१ समाजकल्याणात प्रसार माध्यमांची भूमिका

**५.५ सारांश**

**५.६ पारिभाषिक शब्द**

**५.७ आदर्श उत्तरे (आपली प्रगती तपासा)**

**५.८ स्वाध्याय**

**५.९ संदर्भ**

## ५.० प्रास्ताविक

भारतात समाजसेवेची एक प्रदिर्घ व संपन्न अशी परंपरा आहे. भारतीय संस्कृतीमध्ये नितीमत्ता, सेवाभाव सहकार्याची भावना, परोपकार, त्यागांची भावना, मानव कल्याण इत्यादी मूल्यांना अत्यंत महत्व दिले गेले आहे. प्राचीन भारतीय राजकीय विचारवंत कौटील्याने या संदर्भात असे म्हटले आहे की, प्रत्येक सभ्य समाजातील नागरिक तसेच तेथील राजानी वृद्ध दुर्बल, आजारी, अनाथ मुले व महिला इत्यादी समाजातील विविध घटकांबाबत दयाभाव व सहानुभूति बाळगून त्यांना मदत व सहकार्य केले पाहिजे. तसेच सम्राट अशोक यांच्या शिलालेखामध्ये देखील मानव कल्याण हाच सर्वोकृष्ट धर्म आहे असा उल्लेख आढळतो. या उदाहरणावरून असे दिसते की प्राचीन काळापासूनच काही लोक एका संस्थेच्या रूपात गरजू लोकांना मदत करून समाजसेवा पर्यायाने समाजकल्याणाचे कार्य करित आलेले आहेत. उपलब्ध ऐतिहासिक पुराव्यावरून असे दितसे. की, मानवी कल्याणासाठी स्वंयसेवी संस्थांची निर्मिती प्रत्येक कालखंडात व प्रत्येक ठिकाणी कमी अधिक प्रमाणात झालेली आहे. या स्वयंसेवी संस्थाच्या माध्यमातून अपंग, आजारी व्यक्ती, विधवा, अनाथ मुले इत्यादीची सेवा केली जात होती. तसचे भूकंप, वादळ, महामारी, वनवा, युद्ध, दुष्काळ इत्यादी निसर्ग व मानव निर्मित संकटामुळे अडचणीत आलेल्या लोकांना सेवाभाव, सहकार्याची भावना या विचारातून या स्वयंसेवी संस्थाद्वारे आधार दिला जात असे. समाजातील श्रीमंत, सावकार, जमीनदार व राजे लोककल्याणकारी कार्यात आपले विविध पद्धतीने योगदान देत असे.

स्वातंत्र्य प्राप्तिनंतर भारताने लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार करून लोककल्याणकारी राज्याचे स्वरूप धोरण केले आहे. भारतीय राज्यघटनेतील राज्यनीतीच्या मार्गदर्शक तत्वामध्ये समाजकल्याणाची जबाबदारी शासनावर सोपविण्यात आली आहे. लोककल्याणकारी राज्यामध्ये समाजातील मागास दुर्बल वंचित शोषित घटकांचा सर्वांगिण विकास करणे हे प्रत्येक शासनाचे प्राथमिक व अत्यंत महत्वाचे कार्य मानले जाते. या दृष्टिने प्रत्येक सरकार समाजातील या घटकांचा सर्वांगिण विकास कल्याण व सुरक्षितता या दृष्टिने विविध धोरण कायदे योजना व कार्यक्रमाची निर्मिती करून त्यांची प्रशासकीय यंत्रनेद्वारे अंमलबजावणी करीत असते. परंतु हे सर्व कल्याणकारी कार्यक्रम व योजना चांगल्या प्रकारे राबविण्यात शासनाला व प्रशासनाला अनेक मर्यादा पडतात. जसे की, पुरेसा निधी नसने, मनुष्यबळ नसने, योजना व कार्यक्रमाच्या आखणीतील दोष, अंमलबजावणीतील यंत्रणेचा दोष सरकारी यंत्रणेचा निरूत्साह, भ्रष्टाचार, दप्तरदिरंघाई, संवेदनशीलतेचा अभाव, कमी लोकसहभाग, समाजसेवेच्या भावनेचा अभाव इत्यादी अशा मर्यादामुळे शासनाचे कल्याणकारी कार्यक्रम चांगल्या प्रकारे अंमलात येऊ शकत नाहीत त्यामुळे शासनाला ही सर्व कल्याणकारी कार्य चांगल्या प्रकारे पार पाडण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेला पुरक असा स्वयंसेवी संस्था, अशासकीय संस्था व प्रसार माध्यमे इत्यादी सारख्या विविध घटकांची मदत घेऊन समाजकल्याणाची कार्य प्रभावी पणे पार पाडावे लागते.

प्रस्तुत प्रकरणात आपण स्वयंसेवी संस्था, अशासकीय संस्था व प्रसारमाध्यमे या घटकांची माहिती घेणार असून समाज कल्याणाच्या कार्यात या घटकांची भूमिका काय आहे हे वाहणार आहोत.

## ५.१ उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास...........

१) स्वयंसेवी संस्थेची वैशिष्ट्ये समजतील.

२) समाज कल्याणात स्वयंसेवी संस्थाची भूमिका विशद करता येईल.

३) अशासकीय संस्थाची वैशिष्ट्ये स्पष्ट होतील.

४) समाज कल्याणात प्रसारमाध्यमाची भूमिका समजेल.

## ५.२ स्वयंसेवी संस्था

स्वयंसेवी संस्था ही सामाजिक बांधिलकीची मानवतेची जाणीव ठेवून निश्चित उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी स्वयंप्रेरणेने पुढे आलेली सदस्यांची संघटना असते. स्वयंसेवी संघटनेचे सदस्य कार्यकर्ते मोबदला घेणारे किंवा न घेणारे ही असू शकतात. स्वयंसेवी संस्था कोणत्याही बाह्य नियंत्रणाशिवाय कार्यरत असतात. शासनाशी आर्थिक अवलंब किंवा नियंत्रणात्मक संबंध नसल्यामुळे या स्वयंसेवी संस्था अशासकीय किंवा गैरसरकारी संस्था म्हणूनही ओळखल्या जातात.

स्वयंसेवी संस्थेच्या कार्याला मानवी स्पर्श असतो. लोककल्याणाची आंतरिक तळमळ असते. अनौपचारिक स्वरूपाचे आणि स्थानिक पातळीवर लोकांच्या इच्छेने व सहभागाने कार्यक्रम राबविल्याची क्षमता यांच्याकडे असल्यामुळे या स्वयंसेवी संस्था समाज कल्याणाच्या कार्यात प्रभावी ठरतात.

**५.२.१ अर्थ (Meaning):** स्वयंसेवी (Valuntary) या शब्दाची उत्पत्ती लॅटीन भाषेतील Valuntarism या शब्दातून झालेली आहे. ज्याचा विकास हा Valuntas या शब्दापासून झालेला आहे. Valuntas चा अर्थ 'इच्छा' किंवा 'स्वतंत्रता' असा आहे ही इच्छा एखाद्या संस्था किंवा संघटनेच्या निर्माणातून व्यक्त होते. हेरॉल्ड, लास्की यांच्या मतानुसार संस्था किंवा संघटना स्थापन करण्याचे स्वातंत्र्य म्हणजे आपल्या अभिरूचीनुसार जेव्हा काही व्यक्ती एकत्र येऊन कार्य करतात पण त्यांच्या कार्याला कायदेशीर मान्यता असते. त्यास संस्था किंवा संघटना असे म्हणता येईल.

भारतीय राज्यघटनेतील कलम १९ (१) नुसार नागरिकांना हा अधिकार दिलेला आहे. जी उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सामुहिक किंवा संघटीत प्रयत्नांची गरज आसते अशी उद्दिष्ट्ये संघटना किंवा संस्था स्थापन करूनच प्राप्त केली जावू शकतात.

स्वयंसेवी संस्थाना ऐच्छिक संघटना किंवा गैरसरकारी संघटना असेही म्हटले जाते. आंतरराष्ट्रीय स्तरावर यास गैरसरकारी संघटना Non Governmental Organization (NGO) या या नावाने ही उल्लेख केला जातो. काही अभ्यासक यास Volgas (Valuntary agencies) किंवा (Action Group) असेही म्हणतात. स्वंयसेवी संस्था ह्या सभ्य किंवा सुसंस्कृत समाजाचे प्रतिक मानले जातात.

**५.२.२ व्याख्या:** स्वंयसेवी संस्थेच्या अभ्यासकांनी किंवा विचारवंतानी अनेक व्याख्या सांगितल्या आहेत. त्यातील काही प्रमुख व्याख्या पुढील प्रमाणे

१. डेव्हिड एल. सिल्स यांच्या मतानुसार, ''स्वंयसेवी संस्था अशा लोकांच्या समुह आहे की जो काही सामान्य हिताच्या पुर्तीसाठी स्वौच्छिक आधारावर संघटीत होतात. आणि राज्याच्या नियंत्रणोशिवाय कार्य करतात.''

२. संयुक्त राष्ट्रसंघ यांच्या मतानुसार, स्वयंसेवी संस्था हा स्वायत्त कार्यकारी मंडळाकडून संचलित होणारा, वित्तीय संसाधनासाठी मुख्यत: ते खाजगी क्षेत्रावर अवलंबून राहणारा आणि सामाजिक कल्याणाच्या हेतून वेतन किंवा वेतनाशिवाय कार्य करणारी, सामाजिक कार्यक्रमाची अंमलबजावणी, जनजागृती, संशोधन कार्य, कायदे निर्मितीस सहाय्य करणारा तसेच सामाजिक विकासात स्वच्छेने कार्य करणारा समुह होय.

३. लॉर्ड बेबरीज यांच्या मतानुसार, 'वेतन किंवा वेतनाशिवाय कार्य करणारे बाह्य नियंत्रणापेक्षा स्वनियंत्रणाने कार्य करणारे कर्मचारी किंवा व्यक्तीचा समुह म्हणजे स्वयंसेवी संस्था होय.

थोडक्यात, स्वयंप्रेरणेने किंवा स्वत:हुन सेवा करणारी संस्था म्हणजे स्वयंसेवी संस्था होय. काही लोक स्वत: होऊन निश्वार्थ भावनेने मानवी दृष्टिकोनातून कार्य करण्यासाठी स्वयंसेवी संस्थाची निर्मिती करतात. साधारणत: मानवाची सेवा आणि सामाजिक विकास हेच त्यांचे ध्येय असते. अशा संघटना आपल्या कार्याबाबत बाह्य दबावापासून मूक्त असतात. सामाजिक कल्याणासाठी लोकशाहीचा आधारस्तंभ म्हणून कार्य करतात. लोकांचे कल्याण करणे फक्त शासकीय प्रयत्नाद्वारे शक्य नसून या कार्यात स्वयंसेवीसंस्था ही महत्त्वाची भूमिका बजावू शकतात.

**५.२.३ स्वयंसेवी संस्थाचा उद्देश**

१. समस्या ग्रस्त लोकांमध्ये चेतना निर्माण करून त्यांना आत्मनिर्भर बनविणे, त्यांच्यात सहकार्याची भावना निर्माण करणे.

२. विषम समाजव्यवस्थेचे बळी ठरलेल्या वर्गाच्या सामाजिक समस्या व आवश्यकता यांचे सर्वेक्षण करणे

३. शासकीय योजनांतर्गत मिळणाऱ्या विविध सेवा सुविधाची माहिती आवश्यक लोकांपर्यंत पोहचविणे व त्यांना त्या सुविधांचा लाभ घेण्यासाठी सहाय्य करणे.

४. समाजकल्याणाचे विविध कार्यक्रम योजना यातिल दोष, अडचणी तसेच लोकांच्या गरजा, अपेक्षा यांची माहिती शासनाला कळविणे

५. सामाजिक व आर्थिक समस्या निराकरणासाठी स्थानिक संसाधनांना विकसित करते.

६. गरज व परिस्थितीनुसार कार्यक्रमामध्ये बदल करून कार्यक्रम यशस्वी करणे.

७. सामाजिक बांधिलकी व मानव कल्याण या भावनेने प्रेरित होऊन सामाजिक विकासात सहकार्य करणे.

८. शासनाला समाजकल्याण कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यास मदत करणे.

### ५.२.४ स्वंयसेवी संस्थायी वैशिष्ट्ये

**१. स्वंयप्रेरणेद्वारे निर्मिती:** स्वंयसेवी संस्थाची निर्मिती ही काही लोकांच्या स्वत:च्या इच्छेवर अवलंबुन असते. या संस्थाच्या निर्मिती किंवा स्थापणे मागे सरकारी प्रयत्नापेक्षा काही लोकांच्या स्वंयप्रेरणा कारणीभूत असतात. या प्रेरणेमागे कोणतेही कारण असू शकते. परंतु या स्वंयसेवी संस्थेने एक औपचारिक संघटनात्मक रूप देखील असते.

**२. सेवाभाव:** स्वंयप्रेरणेने किंवा स्वत: हून सेवा करणारी संस्था म्हणजे स्वयंसेवी संस्था होय. या संस्था स्वत: हून निश्वार्थ भावनेने सेवाभावी वृत्तीतून, मानवी दृष्टिकोनातून कार्य करीत असतात. या संस्था प्रामुख्याने लोकल्याणासाठी निर्माण होत असल्यामुळे नफा मिळविणे हा त्यांचा हेतू नसतो लोकांची सेवा करणे हा त्याचा हेतू असतो. ना नफा ना तोटा या तत्वावर या संस्था कार्य करीत असतात.

**३. नोंदणीकृत संस्था:** स्वंयसेवी संस्था या कोणत्या तरी कायद्याच्या अंतर्गत नोंदणीकृत संस्था असतात भारतात केंद्रिय स्तरावर स्वयंसेवी संस्था नोंदणी कायदा १८६०, भारतीय न्यास (Trust) कायदा – १८८२ सहकार समिती कायदा – १९०४ भारतीय कंपनी कायदा – १९५६ कलम २५ अंतर्गत Charitati Company या अंतर्गत नोंदणी केली जाते. याशिवाय राज्यसरकाद्वारे निर्मित कायद्याअंतर्गत देखील यांची नोंदणी होत असते.

**४. लोककल्याणासाठी निर्मित:** स्वयंसेवी संस्थाची निर्मिती ही प्रामुख्याने लोककल्याण साधण्यासाठी केली जाते. लोककल्याण आणि सामाजिक विकास हे स्वयंसेवी संस्थेची ध्येय असते. त्यासाठी समाजकल्याणाच्या विविध क्षेत्रात उदा. शिक्षण, आरोग्य, रोजगार, आदिवासी, महिला, बालक, कामगार इत्यादी या स्वयंसेवी संस्थेद्वारे कार्य केले जाते.

**५. बिनपगारी कार्यकर्ते:** स्वंयसेवी संस्थेमध्ये कार्य करणारे कर्मचारी हे स्वत:हून स्वयप्रेरणेने समाजसेवेची भावना घेऊन कार्य करण्यासाठी स्वयंसेवी संस्थेचा सदस्य बनतात. त्यांना कामाच्या मोबदल्यात पगार किंवा आर्थिक लाभाची अपेक्षा नसते थोडक्यात ते बिनपगारी कर्मचारी किंवा कार्यकर्ते असतात.

**६. बाह्य नियंत्रणापासून मुक्त:** स्वयंसेवी संस्था ह्या आपल्या कार्याबाबत बाह्य घटकांच्या नियंत्रणा पासून मुक्त असतात. या संस्थेतील सदस्यांकडून पदाधिकाऱ्याची निवड केली जाते. तसेच या संस्थाना आपल्या निर्णयाबाबत पूर्ण स्वातंत्र्य लाभलेले असते. निर्णयाबाबत स्वायत्तता लाभलेली आहे.

**७. कार्यकारी मंडळाद्वारे संचलित:** या स्वयंसेवी संस्थेच्या स्तरावर निर्णय घेणारी एक सर्वसाधारण परिषद किंवा आमसभा किंवा संचालक मंडळ असते. त्यांची निवड कायद्यानुसार व लोकशाही तत्वानुसार केली जाते. या मध्ये संस्थेचे वरिष्ठ पदाधिकारी देणगी देणारे व्यक्ती, तसेच इतर महत्वाचे व्यक्ती असतात. संस्थेचे निर्णय घेण्यामध्ये किंवा धोरण ठरविण्यामध्ये हे संचालक किंवा कार्यकारी मंडळ अत्यंत महत्वाची भूमिका बजावते.

**६.२.५ स्वयंसेवी संस्थांची समाजकल्याणातील भूमिका:** समाजसेवा आणि समाजकल्याण या संबंधाचे कार्य सेवाभाव, धैर्य, त्याग संवेदनशीलता निश्वार्थ भावना मानवी भावना इत्यादी गुणयुक्त व्यक्तीद्वारे चांगल्या प्रकारे पार पाडले जावू शकते. असे गुण किंवा भावना शासकीय यंत्रणेतील

अधिकारी व कार्मचाऱ्यात अभावानेच दिसून येते. समाजातील मागास, गरिब, दुर्बल, वंचित, शोषित, निराधार लोकांबाबत मानवी ममतेचा मानवी दृष्टिकोन स्वयंसेवी संस्थेतील कर्मचाऱ्यात तुलनेने अधिक जास्त प्रमाणात दिसून येतो. त्यामुळे समाज कल्याणासंबंधीचे कार्य अशा स्वयंसेवी संस्थाकडून अधिक चांगल्या प्रकारे पार पाडणे शक्य आहे. म्हणून समाजकल्याणाच्या कार्यात स्वयंसेवी संस्थाची भूमिका अत्यंत महत्वाची मानली जाते.

स्वयंसेवी संस्थाची समाजकल्याणातील भूमिका पुढील प्रमाणे विशद करता येईल.

**१. शासकीय धोरण व कार्यक्रमाची यशस्वी अंमलबजावणी:** लोककल्याणकारी राज्यामध्ये सरकारद्वारे देशाच्या सर्वांगिण विकासासाठी विशेषत: समाजकल्याणाच्या कार्यासाठी अनेक योजना व कार्यक्रमांची निर्मिती केली जाते. परंतु या योजना व कार्यक्रमांची जो पर्यंत प्रभावीपणे अंमलबजावणी होत नाही तोपर्यंत त्या योजना व कार्यक्रमांना काहीच अर्थ नसतो. सरकारच्या योजना व कार्यक्रमांना प्रत्यक्ष शेवटच्या घटकापर्यंत, लोकांपर्यंत घेऊन जाण्यामध्ये स्वयंसेवी संस्था अत्यंत महत्वपूर्ण भूमिका बजावतात. शासकीय योजना व कार्यक्रमाची लोकांना माहिती देऊन त्यांचा सहभाग वाढविण्यात तसेच योजना व कार्यक्रमांची यशस्वी अंमलबजावणी करण्यात स्वयंसेवी सस्था एक महत्वपूर्ण साधन ठरले आहे.

**२. सामाजिक परिवर्तनास सहाय्य:** समाजिक व्यवस्थेत सतत परिवर्तन होत असते. या परिवर्तनात सामाजिक मूल्य, रूढी, आचार विचार जीवन पद्धती हे बदलत असतात. या सामाजिक बदलास योग्य गती व दिशा देण्यामध्ये स्वयंसेवी संख्या महत्वाची भूमिका बजावतात या संस्था समाजातील सर्वात शेवटच्या स्तरावर कार्य करीत असल्यामुळे या संस्थांना व्यावहारिक अनुभव प्राप्त झालेला असतो. या अनुभवाला सरकारी धोरणाशी सांगड घालून समाज परिवर्तनाला योग्य दिशा देऊन सामाजिक परिवर्तनाला नियंत्रीत केले जावू शकते. तसेच सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याच्या कार्यास देखील सुरूवात किंवा प्रारंभ या संस्था करतात उदा. म. गांधी यांची हरिजन सेवा इश्वर विद्यासागर यांचे विधवा विवाह संबंधीचे कार्य इत्यादी

**३. जबाबदारीच्या भावनेचा विकास:** समाजाकडून मिळणारे प्रेम, सहकार्य सुरक्षा, साधन संपत्ती इत्यादी बदलात आपण ही समाजाचे काही देणे आहोत ही भावना प्रत्येक नागरिकांनी जोपासणे ही निरोगी, सुदृढ समाजव्यवस्थेसाठी आवश्यक बाब आहे. परंतु आजच्या परिस्थीतीत प्रत्येक जन संकूचित वृत्तीचा बनत चालला असून सामाजिक जाणीव व जबाबदारीची भावना यांच्या मोठ्या प्रमाणात अभाव साप्रत आधुनिक समाजात दिसून येत आहे अशा संकुचित विचारांना प्राधान्य असणाऱ्या आधुनिक सामाजिक परिस्थितीतही समाजाला योग्य मार्गदर्शन करून व्यापक वृत्ती निर्माण करणे, लोकांमध्ये सामाजिक जाणीव विकसित करणे, जबाबदारीच्या भावनेचा विकास करून देश, समाज व मानव हिताची जोपासणा करणारे नागरिक घडवण्यामध्ये या स्वयंसेवी संस्था महत्वाची भूमिका बजावत आहेत.

**४. सामाजिक कायद्याच्या अंमलबजावणीस सहाय्य:** समाजातील अनिष्ठ रूढी कुप्रथा व परंपराचे निर्मुलन करण्यासाठी शासनाद्वारे अनेक सामाजिक कायदे तयार करने ते अंमलात आणले जातात. या सामाजिक कायद्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी लोकामध्ये त्या कायद्या बाबत जनजागृती करून लोकांच्या मानसिकते मध्ये सकारात्मक बदल घडवून आणणे अत्यंत आवश्यक असते. तसेच या कार्यात लोकांचा पाठींबा व सहकार्य मिळवणे देखील आवश्यक आहे. त्या दृष्टिने स्वयंसेवी संस्था लोकांमध्ये एक विशिष्ठ मानसिकता निर्माण करून या कायद्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी होण्याच्या दृष्टिने लोकमत तयार करतात. परिणामी या सामाजिक कायद्यांची चांगल्याप्रकारे अंमलबजावणी होऊन समाजातील अनिष्ठ रूढी प्रथा, परंपरा इत्यादीचे निर्मूलन होण्यास अधिक मदत होते.

५. **सामाजिक नियोजन आणि धोरण निर्मितीस सहाय्य:** देशातील सामाजिक व आर्थिक परिस्थती [illegible] तसेच समाजाच्या गरजांचा शोध घेण्यासाठी आणि विविध सामाजिक समस्यांचे [illegible] सरकार स्वयंसेवी संस्थाची मदत घेत असते. या स्वयंसेवी संस्था सामाजिक [illegible] विविध योजना व कार्यक्रमांचे मूल्यमापन तसेच संशोधनाचे ही कार्य करतात. त्यांच्या या [illegible] कार्यातील निष्कर्षावरून दिलेला सल्ला किंवा माहितीच्या आधारावर शासन देशाचे [illegible] नियोजन करून सामाजिक धोरणांची निर्मिती करित असते.

६. **लोकसहभाग वाढविणे:** विकास कार्यक्रमाच्या निर्मितीत व त्याच्या अंमलबजावणीत लोकांचा सहभाग अत्यंत महत्वाचा असतो. परंतु दुर्दैवाने सरकारच्या विविध योजना व कार्यक्रमात लोकांचा सहभाग नगण्य असल्यामुळे त्या योजना व कार्यक्रम यशस्वी करू शकले नाही समाज विकास व लोककल्याण हे लोकांचया सहभागातूनच शक्य आहे हे सर्वत्र मान्य झाले आहे. विविध सामाजिक समस्यांचे निवारण लोकसहभागा शिवाय अशक्य आहे. स्वयंरूची संस्था लोकांच्या सुख दुखात सहभागी असतात. तसेच लोकांच्या समस्या, आवश्यकता व भावना या संस्थाना माहित असतात. लोकांच्या समस्या प्रेम व सहानुभूतिने समजूनघेतात. त्यामुळे या संस्थांना त्यांच्या कार्यात जन सहयोग चांगला प्रकारे मिळतो. लोकांना विविध विकास कार्याचे महत्व या संस्थाद्वारे समजून सांगितल्यामुळे विकास कार्यात व सामाजिक कल्याणाच्या कार्यामध्ये लोकांचा सहभाग वाढत आहे. परिणामी विकास कार्यक्रम व समाज कल्याणाच्या योजनाची प्रभावी अंमलबजावणी होण्यास मदत मिळत आहे.

७. **लोकमत व जनजागृती निर्माण करणे:** समाजातील कोणत्याही समस्येबाबत किंवा विषयाबाबत लोकांमध्ये जाणीव जागृती घडवून आणणे व त्या समस्या किंवा विषयाबाबत बाजुने किंवा विरोधी लोकमत तयार करण्यामध्ये राजकीय नेते, वृत्तपत्रे व स्वयंसेवी संस्थाची भूमिका महत्वपूर्ण असते. या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून शिक्षण प्रसार, आरोग्य सुविधामध्ये सुधारणा इत्यादी संबंधीची कार्य केली जातात. बालकामगार, बालविवाह अंधश्रद्धा निर्मूलन, हुंडा समस्या महिला अत्याचार, जातीभेद, लिंगभेद थांबविण्यात या संस्थांनी महत्वाची भूमिका बजावली आहे. अनेक वर्षापासून हिन समजल्या जाणाऱ्या जाती या संस्थाच्या प्रयत्नामुळे व सरकारच्या कार्यक्रमामुळे इतर प्रगत जातीबरोबर येत आहेत. सामाजिक न्याय प्रस्थापीत करणे या स्वयंसेवीसंस्था मुळे शक्य होत आहे.

अशा प्रकारे विकास कार्यात व समाज कल्याणाच्या कार्यात स्वयंसेवी संस्था किती महत्वपूर्ण भूमिका बजावतात हे वरील विवेचनावरून स्पष्ट होते.

**आपली प्रगती तपासा स्वयं मूल्यमापन प्रश्न**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) स्वयंसेवी संस्थेचे ध्येय काय असते.

२) स्वयंसेवी संस्थेला आंतरराष्ट्रीय स्तरावर काय म्हटले जाते.

३) स्वयंसेवी संस्था (Valyntary) या शब्दाची उत्पती लॅटीन भाषेतील कोणत्या शब्दापासून झाली आहे.

४) स्वयंसेवी संस्थांची नोंदणी कोणत्या कायद्यानुसार होते.

## ५.३ अशासकीय संस्था

समाज विकास व समाज कल्याणच्या कार्यामध्ये स्वयंसेवी संस्थे इतकेच अशाकीय किंवा गैरसरकारी संस्था ही महत्वाची भूमिका पार पाडतात वास्तविकतेत समाजाच्या सर्वांगिण कल्याणाची प्राथमिक जबाबदारी ही शासनाची आहे. परंतु समाज विकास आणि समाज कल्याणाच्या क्षेत्रात शासनाला कार्य करतांना अनेक मर्यादा पडतात. समाजकल्याणासाठी लोकांची मनोभूमिका तयार

करणे, विकास कार्यात लोकसहभाग मिळविणे, विकासाचे लाभार्थी निवडणे, लोकांच्या मानसिकतेत सकारात्मक बदल घडवून आणणे इत्यादी त्यामुळे विकास व समाजकल्याणाच्या विविध कार्यात शासनाला पूरक म्हणून अशासकीय संस्था कार्य करतात. या अशासकीय संस्थांना गैर सरकारी संस्था किंवा गैरसरकारी संघटना असे ही म्हटले जाते. या अशासकीय संस्थांनी विकास व समाजकल्याणाच्या कार्यातील अफाट क्षमता ओळखून शासन ही आपल्या समाज कल्याणाच्या कार्यामध्ये या अशासकीय संस्थानांही सहभागी करून घेत आहे.

**५.३.१ व्याख्या**

१. प्रा. एम.ए. मुतालिब यांच्या मतानुसार, 'अशासकीय ऐच्छिक संघटना अशा प्रबळ इच्छेने संघटित झालेल्या असतात की, त्या जादुमय बदल घडवून आणतात. काही सामाजिक अपप्रवृत्ती आणि दुर्गुणांचे निर्दालन करू शकता.'

२. डी. चौधरी यांच्या मतानुसार, 'व्यक्ती समुहाने निर्माण केलेल्या आत्मप्रेरणेने कार्यकरणाऱ्या अथवा बाह्य प्रेरणेही संघटीत होऊन विशिष्ट परिसरातील लोकाना विशिष्ठ कार्यासाठी मदत करणाऱ्या, लोकांच्या गरजा ओळखून त्या पूर्ण करणाऱ्या जनतेचा समतोल विकास करण्याचा प्रयत्न करणाऱ्या संस्थाना अशासकीय संस्था किंवा गैरसरकारी संघटना असे म्हटले जाते.

**५.३.२ अशासकीय संस्थेची वैशिष्ट्ये:** अशासकीय संस्था किंवा गैरसरकारी संघटना या ऐच्छिक स्वरूपाच्या असतात त्यामुळे त्यांची रचना ही वेगवेगळी असली तरी त्यांची काही मुलभूत वैशिष्ट्ये मात्र सारखीच असतात. ती वैशिष्ट्ये खालील प्रमाणे आहेत.

**१. स्वायत्तता:** अशासकीय संस्थांना कार्यक्षेत्राची निवड, कार्यपद्धती आणि अंमलबजावणी बाबतची स्वायत्तता म्हणजेच स्वातंत्र्य लाभलेले असते. परंतु नोंदणी कायदा, विश्वस्त (Trust) आणि धर्मदाय संस्था संबंधीचे कायदे आणि नियम यांच्या बंधनात राहून या संस्थाना आपले कार्य करावे लागते.

**२. लवचिकता:** अशासकीय संस्थांचे एक महत्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे ते बदलत्या परिस्थितीनुसार आपल्या कार्यक्रमाच्या आखणीत तसेच अंमलबजावणीत सहज बदल करू शकतात. कारण या अशासकीय संस्थाकडे कार्यक्रम राबविण्यासाठी आवश्यक असणारी लवचिकता, व्यावसायिक क्षमता आणि संघटन कौशल्य असते. त्यामुळे गरजे नुरूप बदल करून ते कार्यक्रमाची कार्यक्षमता व उपयुक्तता वाढवू शकतात. तसेच जलदगतीने व प्रभावीपणे कार्य करू शकतात.

**३. आदर्श व उद्दिष्ठांशी बांधिलकी:** अशासकीय संस्थांना स्वतंत्र अस्तित्व असते. प्रत्येक संस्थेचे आपले स्वतःचे आदर्श, उद्दिष्टे असतात. हे आदर्श आणि उद्दिष्ठ अशासकीय संस्थांचे खरे सामर्थ्य असते अशासकीय संस्थांची ही आदर्श व उद्दिष्ठांशी सुसंगत असतात. उद्दिष्ठांची क्रमवारी देखील राष्ट्रीय उद्दिष्ठांच्या क्रमवारी नुसारच असते. अनेक समस्या असून देखील मर्यादित पैसा व साधन सामग्रीमुळे उद्दिष्ठांची क्रमवारी निश्चीत करावी लागते. अशासकीय संस्थेद्वारे एकदा उद्दिष्ट्ये निश्चित करण्यात आली की ती साध्य केली जातातच.

**४. निधी संकलनाची साधने:** अशासकीय संस्थांना समाज विकास व समाज कल्याणाच्या विविध क्षेत्रामध्ये अनेक प्रकारची कार्ये पार पाडावी लागतात ही कार्ये पार पाडण्यासाठी पैशाची अत्यंत गरज असते या संस्थाना लागणारा पैसा किंवा निधी विविध मार्गाने ते गोळा करतात. काही संस्था सदस्य वर्गणी सेवा खर्च, धर्मदाय आयुक्ताकडून मिळणारे अनुदान लोक वर्गणीद्वारे जमा होणारा निधी श्रीमंताकडून मिळणाऱ्या देणग्या केंद्र व राज्य शासना कडून मिळणारे अनुदान विदेशी संस्थांकडून मिळणारी आर्थिक मदत इत्यादी साधणाद्वारे निधी गोळा केला जातो. काही संस्था निधी न उभारता लाभार्थी व देणगीदार यांच्या दरम्यान मध्यमस्थाची भूमिका बजावतात.

५. **जनतेचा ऐच्छिक सहभाग:** या संस्था ज्या लोकांसाठी कल्याणाचे व विकासाचे कार्यक्रम राबवितात त्या लोकांचा या कार्यात सक्रिय सहभाग घेण्याबाबत खुपच आग्रही असतात. शासकीय कार्यक्रमाप्रमाणे एखादे कल्याणाचे कार्य लोकांवर लादून त्यांचा सहभाग गृहित धरून त्या कार्य करीत नाहीत. तर एखादे कार्य हाती घेतल्या पासून त्या कार्याची अंमलबजावणी पूर्ण होईपर्यंत प्रत्येक टप्प्यावर संबंधीत लोकांना विश्वासात घेऊन कार्य केले जाते. या कार्यात संबंधीत लोकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळविला जातो.

**५.३.३ अशासकीय संस्थाची कार्ये:** अशासकीय संस्था खालील पैकी कोणत्याही क्षेत्रात कार्य करतात.

१) समाजकल्याण, २) महिला व बालकल्याण विकास, ३) आदिवासी विकास, ४) वन व पर्यावरण विकास, ५) मानवाधिकार, ६) चिकीत्सा व आरोग्य, ७) स्वच्छता व पेयजल, ८) ग्राहक संरक्षण, ९) दळण वळण, १०) लघू व कठोर उद्योग, ११) पूनर्वसन, १२) शिक्षण व प्रौढ शिक्षण, १३) स्वयंरोजगार व स्वयंसहाय्यता गट, १४) अंधश्रद्धा निर्मूलन, १५) नशा बंदी, १६) सामाजिक सुरक्षा, १७) अपंग कल्याण, १८) परिवार कल्याण, १९) धार्मिक कार्य, २०) अपारंपरिक व अक्षय उर्जा, २१) ग्रामीण विकास, २२) वन्यजीव संरक्षण, २३) कृषी विकास, २४) पंचायत राज सशक्तीकरण, २५) कला व संस्कृती, २६) युवक व क्रीडा, २७) सुशासन व माहिती तंत्रज्ञान, २८) पुरातत्व संरक्षण, २९) जनजागृती

**आपली प्रगती तपासा स्वयंमूल्यमापन प्रश्न**

**ब) रिकाम्या जागा भरा**

१) अशासकीय संस्थांना ............. संघटना ही म्हटले जाते.

२) अशासकीय संस्था या ........... स्वरूपाच्या असतात.

३) प्रत्येक अशासकीय संस्थेचे स्वतःचे ........ व ....... असतात.

## ५.४ प्रसार माध्यमे

समाज विकास आणि सामाजिक कल्याणाच्या कार्यामध्ये शासनाला पुरक म्हणून स्वयंसेवी संस्था, अशासकीय संस्था प्रमाणेच प्रसारमाध्यम देखील अत्यंत महत्वाची भूमिका बजावतात. आधुनिक लोकशाही समाजामध्ये लोकप्रशासन शासनाच्या नियंत्रणाखाली तर शासन जनतेच्या नियंत्रणाखाली कार्य करीत असते. म्हणजे लोकशाही व्यवस्थेमध्ये जनता ही अंतीम सत्ता असते. त्यामुळे लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये शासन व प्रशासनाच्या कार्यात लोकाचा सहभाग असने अत्यंत महत्वाचे असते. विकास कार्यात लोकांचा सहभाग असेल तसेच विकास कार्याला लोकांचा पाठींबा असेल तरच कोणतेही सरकार समाज विकास व राष्ट्र विकासाचे कार्य चांगल्या प्रकारे करू शकते. म्हणून विकास कार्यात लोकसहभाग, लोकांचे सहकार्य, किंवा लोकांचा पाठींबा मिळविण्यासाठी शासनाला आपल्या सर्व विकास कार्याची योजना व कार्यक्रमांची माहिती लोकांना सांगावी लागते आणि लोकसहभाग किंवा लोकांचा पाठींबा मिळवावा लागतो. समाज विकास आणि समाज कल्याणाच्या कार्यक्रम व योजनांची माहिती शासनाकडून लोकापर्यंत पोहचविण्याचे अत्यंत महत्वाचे कार्य प्रसार माध्यमे करतात. शासन करीत असलेल्या विकास कार्याची समाज कल्याणाच्या कार्याची माहिती जनतेला देणे हे प्रसार माध्यमांचे अत्यंत महत्वाचे कार्य आहे. प्रसार माध्यमांच्या साधनामुळे वृत्तपत्र, सिनेमा, आकाशवाणी, दूरदर्शन, पुस्तके, प्रकाशने, भ्रमणध्वनी, इंटरनेट, पारंपरिक ग्रामीण माध्यमे इत्यादीचा समावेश होतो.

**५.४.१ समाजकल्याणात प्रसार माध्यमांची भूमिका**

**१. सामाजिक परिवर्तन व विकासास सहाय्यक:** प्रा. डेनिस मॅक्कील यांनी प्रसार माध्यमांना समाज परिवर्तनाचे एक महत्वाचे साधन म्हटले आहे. समाजाचा सर्वांगिण विकास हे प्रसारमाध्यमांचे आद्य कर्तव्य असते. माहिती तंत्रज्ञानाचा जलद विकासाचा विशेषत: Mass Media चा मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रावर परीणाम झाला असून त्यामुळे मोठ्या प्रमाणात बदल घडून आला आहे. याचा प्रामुख्याने सांस्कृतिक जीवनावर मोठा बदल होऊन पारंपरिक समाजाचे रूपांतर आधुनिक समाजात होतांना दिसत आहे.

प्रसार माध्यमे समाज परिवर्तनाच्या दिशा विकसित करतात. वृत्तपत्रापेक्षा आकाशवाणी व दुरदर्शण ही दृकश्राव्य माध्यमे याबाबत अधिक प्रभावी ठरत आहेत. अविकसीत व विकसनशील राष्ट्रामध्ये प्रसारमाध्यमांचे कार्य सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तनाच्या संदर्भात अधिक महत्वाचे आहे. समाजातील विषमता दूर करणे, उपेक्षीतांचे प्रश्न मांडने कुटुंब, समाज व राष्ट्रीय जीवनात नवीन मूल्य पेरणे हे माध्यमांचे कर्तव्य आहे लोकशिक्षणाबरोबरच सामाजिक परिवर्तनाच्या दृष्टीने नव्या प्रतिकांना प्रस्थापीत करणे मान्यता मिळवून देणे, अभिरूची संपन्न करणे, दृष्टिकोन व मानसिकतेत बदल करणे, मूल्य धारणा घडविणे, हिंसा व संघर्षाचा त्याग करून सामाजिक सद्भाव सौहार्द वाढीस लावणे महत्वाचे असते. प्रसार माध्यमाच्या समाज परिवर्तन कार्यास मर्यादा असल्यातरी त्यामुळे सामाजिक वातावरणामध्ये होणारा बदल हा निश्चीतच महत्वाचा आहे.

**२. विकासकार्यात लोकसहभाग वाढविण्यास सहाय्यक:** समाज विकास व समाजकल्याणाच्या विविध योजना व कार्यक्रम यशस्वी पणे अंमलात आणायचे असेल तर त्या विकास कार्यात लोकांचा सहभाग असणे अत्यंत आवश्यक आहे. विकास कार्यात लोकांचा सहभाग नसेल तर विकासाच्या योजना व कार्यक्रम कितीही चांगले असले तरी त्यांची योग्यपणे अंमलबजावणी होत नाही. भारतामध्ये दुर्दैवाने विकास कार्यात लोकसहभाग नसल्यामुळे किंवा लोकांना सहभागी करून न घेतल्यामुळे समाजविकासाचे अनेक चांगले कार्यक्रम व योजना अयशस्वी ठरल्या आहेत. विकास कार्यात लोकांना सहभागी करून घेण्यासाठी सर्वप्रथम लोकांना विकास कार्याची, योजनांची व विविध कार्यक्रमांची माहिती द्यावी लागते. त्याचे महत्व पटवून द्यावे लागते. प्रसारमाध्यमे लोकांना विकास कार्यक्रम व योजनांची माहिती करून देतात तसेच लोकांना या विकासकार्याचे महत्व व उपयुक्तता पटवून देतात. आणि लोकांना शासन व प्रशासन तसेच विकास कार्यात सहभागी होण्यासाठी प्रेरित करतात. त्यामुळे विकास कार्यात लोक हिरेरीने सहभागी होतात. अशा प्रकारे विकास कार्यामध्ये लोकांचा सहभाग वाढविण्यास प्रसारमाध्यमे महत्वाची भूमिका बजावतात.

**३. लोकमत तयार करण्यास सहाय्य:** अविकसित व विकसनशील समाजामध्ये अनेक प्रकारचे प्रश्न व सामाजिक समस्या विद्यमान असतात. त्यामुळे प्रसारमाध्यमांना सामाजिक समस्यांबाबत लोकांचे प्रबोधन करण्याबरोबरच विविध विषयांवर लोकमत ही तयार करावे लागते. विविध विषयांवर लोकमत तयार होत असल्यामूळे सरकारला विकास कार्याचा प्राधान्यक्रम ठरवावा लागतो. तसेच लोकमताचा आदर करून विविध प्रकारचे ज्वलंत विषय प्राधान्याने हाती घेऊन सोडवावे लागते.

**४. माहितीचा प्रसार करण्यास सहाय्यक:** शासन करत असलेल्या विकास कार्याची तसेच समाज कल्याणच्या कर्याची योजना व कार्यक्रमांची माहिती जनतेला देणे हे प्रसार माध्यमांचे अत्यंत महत्वाचे कार्य आहे. कारण माहितीचा अभाव असल्यामुळेच जनता विकास कार्यात सहभागी होत नसे. परिणामी ज्या घटकांसाठी योजना व कार्यक्रम असतात तोच घटक त्या कार्यक्रम व योजनेच्या लाभा पासून वंचित राहतात. लोकांना अचूक व जलद माहिती उपलब्ध करून देणे हे केवळ प्रसार माध्यमाद्वारेच शक्य आहे.

**५. जनजागृती करण्यास सहाय्यक:** प्रसार माध्यमे केवळ मनोरंजनेच करतात असे नसून ते समाजामध्ये विविध विषयांवर जनजागृती देखील घडवून आणण्याचे महत्वाचे कार्य करतात. मागास व विकसनशील समाजामध्ये अनेक प्रकारच्या सामाजिक समस्या विद्यमान असतात. हुंडा पद्धती, जाती प्रथा, लिंगभेद, अंधश्रद्धा, अस्वच्छता, भ्रष्टाचार इत्यादी समस्यामुळे समाज विकासाच्या गतीला खीळ बसत असते. त्यामुळे शासनाद्वारे या विविध समस्यांचे निर्मूलन करण्यासाठी विविध प्रकारचे प्रयत्न केले जात असतात. त्याला पुरक प्रयत्न प्रसारमाध्यमाद्वारे ही केले जात असतात. या विविध सामाजिक समस्या बाबत लोकांना माहिती देऊन लोकांचे प्रबोधन प्रसार माध्यमाद्वारे केले जाते प्रसारमाध्यमाद्वारे केल्या जाणाऱ्या या लोकशिक्षणाच्या कार्यामूळे लोकांमध्ये सदरील सदस्यांबाबत जाणीव जागृती निर्माण होऊन या समस्या हद्दपार होण्यास मदत होते.

**६. दुर्बल घटकांचा कल्याणास सहाय्यक:** सामाजिक संतुलनासाठी प्रसारमाध्यमे दुर्बल घटकांचा कल्याणसाठी सदैव कार्यरत असतात. दीन–दलित, भटक्या विमूक्त, आदिवासी वर्गाच्या कल्याणासाठी प्रसारमाध्यमांची भूमिका रक्षकाची असते. स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी वृत्तपत्रे याबाबत सदैव जागरूक राहतात. या घटकांचे प्रश्न बुलंदपणे मांडतात. दुर्बल घटकांना सहाय्य करणे हे प्रसारमाध्यमांची खरी जबाबदारी आहे.

**आपली प्रगती तपासा स्वयंमूल्यमापन प्रश्न**

**क) चूक किंवा बरोबर ओळखा**

१) प्रसार माध्यमे केवळ मनोरंजन करणारे साधन आहे.

२) शासनाच्या विकासकार्याची माहिती जनतेला देणे हे प्रसार माध्यमाचे मुख्य कार्य आहे.

३) गुणात्मक व स्वतंत्र प्रसारमाध्यमेच समाज परिवर्तन व समाज विकासात महत्वाचे योगदान देऊ शकतात.

## ५.५ सारांश

भारतातील सामाजिक कार्याच्या प्रदिर्घ इतिहासात स्वयंसेवी संस्थांनी नेहमीच अग्रनी भूमिका बजावली आहे. म्हणून स्वातंत्र्यानंतर सरकारने समाजकल्याण व विकासाच्या कार्यात स्वयंसेवी संस्थांना मोठ्या प्रमाणात सहभागी करून घेतले त्यामुळे स्वयंसेवी संस्थेच्या संख्येत प्रचंड वाढ झाली. आज समाज विकास व कल्याणाचे संबंधीत अनेक प्रकारची कार्ये या संस्थांद्वारे पार पाडली जात आहेत. भारतीय समाज व्यवस्थेतील विषमता, अभावता तसेच विविध सामाजिक समस्यांचा विचार करता स्वयंसेवी संस्थाची भूमिका अत्यंत महत्वपूर्ण आहे. म्हणून शासकीय स्तरावर यासाठी मुक्त धोरण स्वीकारण्यात आले आहे. परंतु आज समाजसेवेच्या नावाने अनेक बनावट स्वयंसेवी संस्थांचे पेव फुटले असून बऱ्याच स्वयंसेवी संस्था स्वतःच्या सेवेसाठीच निर्माण झाल्याचे दिसते. म्हणून स्वयंसेवी संस्थांसंबंधी कायद्याचे कठोरपणे पालन होणे आवश्यक आहे.

स्वयंसेवी संस्था प्रमाणेच अशासकीय संस्था देखील समाजविकास व समाजकल्याणाच्या कार्यात अग्रेसर आहेत. अनेक मर्यादा व दोष असूनही अनेक अशासकीय संस्था भारतीय समाजात जागरूकता निर्माण करण्याचे कार्य करित आहे. विशेषतः पर्यावरणीय प्रश्न, रोजगार, दुर्बलाचे सशक्तीकरण, आर्थिक सुरक्षा आरोग्य इत्यादी क्षेत्रात जनसेवेला आदर्श मानूनच या संस्था कार्य करित आहे असे असलेतरी आंतराष्ट्रीय स्तरावरील अशासकीय संस्थापेक्षा भारतीय अशासकीय संस्था अजुनही बाल अवस्थेत आहे. व्यवस्थापकीय आणि आर्थिक समस्यामूळे या संस्थाना पुरेसे कार्य करता येत नाही. त्याही पेक्षा फक्त पैसा मिळविण्यासाठी निर्माण झालेल्या संस्थाचे प्रमाण

जास्त आहे. त्यामुळे चांगल्या हेतुने कार्य करणाऱ्या संस्थाकडे संशयाने व अविश्वासाने पाहिले जाते. त्यामुळे चांगल्या अशासकीय संस्थाच्या कार्यालाही अनेक मर्यादा निर्माण होतात.

समाजामध्ये विविध सामाजिक विषयाबाबत जनजागृती करणे तसेच विविध विषयावर लोकमत तयार करण्यात प्रसार माध्यमांची भूमिका महत्वाची आहे. लोकशाही मध्ये अधिकाधिक लोकांचे अधिकतच कल्याण करायचे असेल तर सामाजिक कल्याण व सुरक्षा विषयक योजना बहुजनापर्यंत प्रसारमाध्यमांनी पोहोचविल्यास सामाजिक न्यायाची प्रस्थापना होऊ शकते. परंतु प्रसार माध्यमांची संख्यात्मक वाढ पाहता या विकासाचे रूपांतर गुणात्मक वाढीत होणे अत्यंत आवश्यक आहे. आधुनिक जीवनात मूल्यांचे राजकारण लोपले असून सत्तेचे राजकारण केंद्रस्थानी आले आहे. त्याचा परिणाम म्हणजे प्रसारमाध्यमावरील वाढता राजकीय प्रभाव होय. त्यामुळे प्रसार माध्यमामध्ये राजकीय घडामोडी व इतर नकारात्मक घडामोडींवर जास्त चर्चा होऊन मुळ समाज विकासाचे विषय उपेक्षित राहत आहेत. म्हणून गुणात्मक व स्वतंत्र प्रसार माध्यमेच समाज विकास व परिवर्तनात महत्वाचे योगदान देऊ शकतात.

## ५.६ पारिभाषिक शब्द

- **स्वायत्त (Autonomous):** स्वयंशासित बाह्य घटकांच्या नियंत्रणापासून मुक्त असणे कार्य व निर्णयाबाबत स्वतंत्र असणे.

## ५.७ आदर्श उत्तरे (आपली प्रगती तपासा)

**अ) एका वाक्यात उत्तरे**

१) मानवसेवा, लोककल्याण व सामाजिक विकास हे स्वयंसेवी संस्थेचे ध्येय असते.

२) स्वयंसेवी संस्थाना आंतरराष्ट्रीय स्तरावर गैरसरकारी संघटना म्हटले जाते.

३) स्वयंसेवी संस्था (Valauntary) या शब्दाची उत्पत्ती लॅटीन भाषेतील ‘Valuntas’ या शब्दातून झाली आहे.

४) स्वयंसेवी संस्थानोंदणी कायदा १८६० यानुसार स्वयंसेवेची संस्थापी नोंदणी होते.

**ब) रिकाम्या जागा भरा.**

१) गैरसरकारी

२) ऐच्छिक

३) आदर्श व उद्दिष्ट्ये

**क) चूक किंवा बरोबर ओळखा**

१) चूक

२) बरोबर

३) बरोबर

## ५.८ स्वाध्याय

**दिर्घोत्तरी प्रश्न**

१) स्वयंसेवी संस्थेची वैशिष्ट्ये सांगा

२) प्रसार माध्यमांची समाजकल्याणातील भूमिका विशद करा.

३) अशासकीय संस्थेचे वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

**लघुत्तरी प्रश्न**

१) समाज विकास व समाज कल्याणामध्ये स्वयंसेवी संस्थांची भूमिका स्पष्ट करा.

**टिपा द्या.**

१) स्वयंसेवी संस्थाची उद्दिष्ट्ये

## ५.९ संदर्भ


१. प्रा. कोत्तापल्ले लक्ष्मण (२०१४), भारतातील सामाजिक कल्याण प्रशासन व समाजकार्य विद्याबुक पब्लीशर्स, औरंगाबाद

२. डॉ. सचदेव डी.आर. अनु. फडके, राऊळे (२०१२) भारतातील समाजकल्याण व समाजकल्याण प्रशासन के सागर पब्लीकेशन, पुणे

३. डॉ. सुरेंद्र कटारिया (२०१०) सामाजिक प्रशासन, आर बी एस ए पब्लिशर्स, जयपूर

४. Poul, sing, John, Poseanch Paper on "Roll of mass media and socil Awarness" Publishal in International Journal of Humanities and social Seience. Vol.(1) Aung. 2013 Page 34-38


## ५.१० अधिक वाचनासाठी पुस्तके


१. पाटील वा.भा. (१९९९). विकासाचे प्रशासन, विद्या बुक्स, नागपूर

२. मिश्रा दयाकृष्ण (१९९७) सामाजिक प्रशासन कॉलेज बुक डेपो, जयपूर





**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**

दूरशिक्षण संचालनालय, ज्ञानतीर्थ, विष्णुपुरी, नांदेड ४३१ ६०६ (महा.)

दूरध्वनी:०२४६२–२२९१४४, ई–मेल: **decsrtmun@gmail.com**

संकेत स्थळ : **www.srtmun.ac.in**


9 789389 150278